**<u>ठळक बातम्या</u>**

- पाणी ही मानवी संस्कृतीची जीवनरेखा असून, भविष्यातल्या पिढ्यांसाठी त्याचं संरक्षण करण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं जलदिनानिमित्तच्या संदेशात प्रतिपादन

- लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेविषयी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी बोलावलेली बैठक चेन्नईत सुरु

- स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा सामना चीनच्या अव्वल मानांकित जोडीशी रंगणार

- १८व्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**आणि**

- जगप्रसिद्ध मुष्टियोद्धा जॉर्ज फोरमन यांचं निधन

**<><><><><>**

आज जागतिक जल दिवस आहे. आजचा दिवस पाण्याच्या जिवंत स्त्रोतांचं महत्व अधोरेखित करून त्याच्या शाश्वत व्यवस्थापनाचा पुरस्कार करतो. जगभरातल्या जलसंकटाचा सामना करण्यासाठी जागरूकता निर्माण करून, कृतीला प्रेरणा देणं हे याचं उद्दिष्ट आहे. जागतिक जल दिवस हा २०३० सालापर्यंत सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता सुनिश्चित करण्याच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडला आहे. 'हिमनद्यांचं संवर्धन', ही यंदाच्या जल दिनाची संकल्पना आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक जल दिनानिमित्त पाण्याचं संवर्धन आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या देशाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला

आहे. पाणी ही मानवी संस्कृतीची जीवनरेखा असून, भविष्यातल्या पिढ्यांसाठी त्याचं संरक्षण करण्याची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

जलसंकट हा जागतिक चिंतेचा विषय बनला असला, तरी भारताने या आव्हानाचं संधीत रूपांतर केलं आहे, असं केंद्रीय जलसंपदा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जागतिक जल दिना निमित्त समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आज 'अर्थ अवर', या जगातल्या सर्वात मोठ्या पर्यावरण विषयक चळवळीत सहभागी होणार आहे. दर वर्षी मार्च महिन्यातल्या एका शनिवारी रात्री साडे आठ ते साडे नऊ या वेळात 'अर्थ अवर'चं आयोजन केलं जातं. यावेळी जगभरातले नागरिक अनावश्यक विद्युत उपकरणं बंद करतात. भारतातही सर्व प्रसिद्ध ठिकाणं, स्मारकं, सार्वजनिक- खासगी संस्था, व्यवसाय आणि समुदाय या उपक्रमात एकत्रितपणे सहभागी होतात. यंदा अर्थ अवरमध्ये जल संवर्धनावर विशेष लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. ऑस्ट्रेलियात सिडनी इथं २००७ साली वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर (WWF) ने द सिडनी मॉर्निंग हेराल्डच्या सहकार्याने 'अर्थ अवर' ची सुरुवात केली होती.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या स्थापना दिनानिमित्त बिहारवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. बिहार ही प्राचीन काळापासून ज्ञान आणि विकासाची भूमी असल्याचं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. बिहारचे नागरिक त्यांची प्रतिभा, निश्चय आणि कष्ट यातून विकसित बिहारसाठी आणि पर्यायाने समृद्ध भारतासाठी भरीव योगदान देत राहतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बिहारचं वर्णन दिग्गज

व्यक्तिमत्त्वांची पवित्र भूमी असं केलं आहे. बिहारच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मोदी यांनी दिली आहे.

**<><><><>**

राज्यात पायाभूत सुविधांचं काम विलक्षण वेगानं सुरु असून 'हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल, फेज -१' या महत्वाकांक्षी प्रकल्पामुळे राज्याच्या पायाभूत सुविधांना लक्षणीय गती मिळाली आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या आढावा बैठकीत बोलत होते.

पायाभूत सुविधांसाठी राज्यात ४१ हजार ७३० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून या प्रकल्पाअंतर्गत सुमारे सहा हजार किलोमीटर रस्त्यांची कामं सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं. आत्तापर्यंत २५ हजार ८७५ कोटी रुपयांची तरतूद झाली असून अनेक बँकांच्या आर्थिक सहकार्यामुळे मजबूत आणि संपर्कक्षेत्र विस्तारलेल्या राज्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. शंभर दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत विक्रमी वेळेत पाच टक्क्यांनी अधिक प्रगती करत या प्रकल्पानं अपेक्षा पूर्ण केल्या आहेत, तसंच या वर्षभरात अंदाजे एक लाख कोटी रुपयांचा पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्याचं नियोजन असल्याचं फडणवीसांनी सांगितलं. शंभर दिवसात एकूण ३४ जिल्ह्यांमधल्या सुमारे पाच हजार ९७० किलोमीटर रस्त्यांचं अद्ययावतीकरण करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आखण्यात आला होता, त्यानुसार निर्धारित वेळेत हे लक्ष साध्य झाल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

देशाच्या मध्यभागी असलेलं नागपूर हे शांततेचं प्रतीक आहे, इथं कधीही दंगली झाल्या नाहीत. हिंदू-मुस्लिम समाजाचं अतूट प्रेमाचं नातं या शहरात आहे. हे नातं तोडण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ देता कामा नये, असं आवाहन काँग्रेसचे नेते

माणिकराव ठाकरे यांनी आज नागपूर इथं केलं. काँग्रेस सत्यशोधन समितीनं नागपूर हिंसाचार प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाला असा मोर्चा काढण्याची परवानगी का दिली आणि त्या मोर्चात झालेल्या आक्षेपार्ह कृती पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून थांबवल्या का नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या घटनेतल्या दुसऱ्या बाजूची कृतीही निषेधार्हच आहे. कोणत्याही कारणाने सामान्य माणसांचं नुकसान होणं दुर्दैवी आहे, असंही ठाकरे यांनी सांगितलं. भारतीय जनता पक्ष आणि विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अशा त्यांच्याशी संलग्न संघटनांनी चिथावणीखोर वक्तव्यं करायचा कार्यक्रमच हाती घेतला असून हे शब्द महाराष्ट्राच्या जनतेला तोडणारे आहेत, असा आरोप ठाकरे यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत तमिळनाडूचे मुख्यमंत्री M.K. स्टालिन यांनी बोलावलेली सर्वपक्षीय बैठक आज चेन्नई इथं होत आहे. आपला पुनर्रचनेला विरोध नाही तर पुनर्रचना न्याय्य व्हावी, अशी आपली मागणी असल्याचं स्टालिन म्हणाले. मतदारसंघांची पुनर्रचना लोकसंख्येच्या आधारावर झाल्यास लोकसंख्या नियंत्रण यशस्वीपणे राबवणाऱ्या राज्यांवर अन्याय होईल, असं ते म्हणाले. पुनर्रचना करताना देशाच्या विविधतेचं रक्षण व्हायला हवं, अशी भूमिका केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी मांडली. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हे देखील या बैठकीला उपस्थित आहेत. दरम्यान, ही सर्वपक्षीय बैठक वृथा असल्याची टीका भाजपानं केली आहे.

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये बासेल इथं सुरु असलेल्या स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा सामना चीनच्या शेंग शु लिऊ आणि टॅन निंग या अव्वल मानांकित जोडीशी होईल. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ५ वाजून १० मिनिटांनी सामना सुरु होईल.

काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत ट्रीसा आणि गायत्री यांनी हाँगकाँग चीनची आठवी मानांकित जोडी, येउंग नगा टिंग आणि येउंग पुई लाम यांचा पराभव केला होता.

<><><><><>

क्रिकेट रसिकांचं लक्ष लागून  असलेल्या आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला आजपासून कोलकात्यात सुरुवात होत आहे. कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात आज सलामीचा सामना होणार असून एकूण १० संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. आयपीएलचा हा १८वा हंगाम आहे.

<><><><><>

जगप्रसिद्ध  मुष्टियोद्धा जॉर्ज फोरमन यांचं काल रात्री निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. बॉक्सिंग रिंगमधले ‘बिग जॉर्ज’ म्हणून ओळखले जाणारे, फोरमन, यांची कारकीर्द बॉक्सिंग इतिहासातली सर्वात अतुलनीय आणि दिर्घ काळाची ठरली. १९६८ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धेत  सुवर्णपदक जिंकून त्यांनी जागतिक पटलावर पहिल्यांदाच आपलं नाव कोरलं. त्यानंतर ७० च्या दशकात आणि १९९४ मध्ये असं दोनदा ‘हेवीवेट’ जागतिक अजिंक्यपद जिंकलं. तसंच वयाच्या ४५ व्या वर्षी ते जगातले सर्वाधिक वयाचे ‘हेवीवेट चॅम्पियन’ ठरले.

फोरमन यांच्या निधनाबद्दल दिग्गज मुष्टियोद्धा माइक टायसन आणि जेक पॉल यांच्यासह आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रातल्या मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

पूर्व आणि ईशान्य भारतात उद्यापर्यंत मेघगर्जनेसह जोरदार वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. याच काळात दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाच्या सरी कोसळतील.

मध्य महाराष्ट्र, पूर्व मध्यप्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, झारखंड आणि ओदिशामध्ये आज वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

ईशान्य भारतात आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये, तर दक्षिणेकडे तामिळनाडू, पुडुचेरी, केरळ, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश किनारपट्टी, तेलंगणा आणि कर्नाटकच्या अंतर्गत भागात पुढले ४ दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज आहे.

दरम्यान, कोकण, गोवा, गुजरात किनारपट्टी, तामिळनाडू, पुडुचेरी आणि करैकलमध्ये काही भागात उष्ण आणि दमट हवामान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**